**नि.ख.क्र. २६१/२०१८**
**निशाणी क्र. ३८**
**सरकार वि. मिलींद जाधव**

**सा.क्र. ३ प्रदीप पोखरणा यांचा शपथेवर उलटतपास – आरोपी क्र. १ ते ३ करीता वकील श्री.कर्नावट यांचेतर्फे**

मी १० वी पर्यत शिकलो आहे. मला मराठी लिहिता वाचता येते. पोलीसांनी माझा जबाब घेतला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की माझा मुलगा रुषी याने पो.स्टे. ला दि.२२/१२/२०१७ रोजी फिर्याद दिली होती. दि. २१/१२/२०१७ व २२/१२/२०१७ रोजी माझी पोलीसांसोबत चर्चा झाली होती. मी पोलीसांना सर्व आरोपी व इतर ४ ते ५ अज्ञात इसमांनी मला कपांउंड मध्ये स्कुटर लावत असतांना मारहाण सुरु केली असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की सदर बाब पोलीसांनी माझे जबाबात लिहिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी धावुन आले, त्यांनी मला लाथाबुक्यांनी मारहाण केली त्यामूळे मी घाबरुन घरात पळून गेलो हे देखिल पोलीसांनी जबाबात लिहिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की सागर जाधव व मिलिद जाधव उडी मारुन कंपाउंडच्या आत आले, त्यांनी मला लाथाबुक्यांनी मारहाण केली आणि ते तेथुन निघुन गेले किंवा त्यानंतर मी पोलीस स्टेशनला फोन करणेचा प्रयत्न केला परंतु फोन लागला नाही किंवा माझी मुलगी घ रातून बाहेर आली, त्यानंतर मी आरोपींचे फोटो काढणेकरीता गेटजवळ गेलो किंवा फोटो ऐवजी व्हिडीओ रेकॉर्डींग सुरु झाली किंवा त्यानंतर आरोपींनी मला हाथाबुकयांनी व लाथांनी मारहाण केली हे देखिल पोलीसांनी जबाबात लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे जबाबामध्ये कंपाउंडच्या बाहेर पडलेला दगड उचलून माझया डोक्यावर मारला असे जबाबात लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर ज्ञानेश्वर वालतुले यानी मला दगडाने जखम झालेल्या ठिकाणी हाथाबुक्यांनी मारहाण केली, माझया कानपट्टीवर मारहाण केली त्यामूळे जखमेतून रक्त निघुन जमिनीवर सांडले असे जबाबात लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे

मुलीने फोन करुन मुलगा रुषी याला बोलविले व तो आला हे जबाबात लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीसंनी मला यादी दिली व मी घोटी ग्रामीण रुग्णालयात गेलो व उपचार घेवून पुन्हा साडेसहा वाजता पो.स्टे. ला आलो हे जबाबात लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी माझी तक्रार घेतली नाही व त्याठिकाणी तीन आरोपी हजर होते हे देखिल माझे जबाबात लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपी व पोलीस एकमकांशी चर्चा करत होते, रात्री ९.०० र्प्यत पोलीसांनी माझी तक्रार नोंदवुन घेतली नाही, मी ९.०० वाजेपर्यत थांबलो, तक्रार घेतली नाही म्हणुन मी मुलासह घरी निघुन गेलो हे माझे जबाबात लिहिलेले नाही.

हे म्हणणे खरे आहे की घरी गेल्यानंतर मी मोबाईल मधील गुगलवर एफआरआर ॲप वरील हेल्प बटन क्लिक केले किंवा त्यानंतर पाच मिनिटांनी मला मुंबई पोलीसांचा फोन आला, त्यांनी मला घोटी पो.स्टे. तुमची तक्रार घेत नसल्यास पोलीस अधिक्षक यांना तक्रार असे सागितले हे देखिल माझे जबाबात लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की दुस-या दिवशी सकाळी १०.०० वाजता घोटी पो.स्टे. येथुन पो.ना.श्री शेळके माझे घरी आले, त्यांनी माझी विचारपूस केली, त्यानंतर ते आरोपींच्या घरी गेले व आरोपींच्या घरी एक तास चर्चा केली किंवा मी १२.०० वाजेचे सुमारास ग्रामीण रुग्णालय घोटी येथे गलो, त्यांनी सिव्हील हॉस्पीटल नाशिक येथे जाणेकरीता चिठठी दिली, नंतर मी घरी आलो, आराम केला व दुपारी ३.०० वा.सुमारास नाशिक येथे जाणेकरीता निघालो असे माझे जबाबात नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की दि.२२/१२/२०१७ रोजी रात्री ८.०० वाजेपर्यत मी एक्सरे व सिटी स्कॅन केले आणि रात्री १०.०० र्प्यत घोटी येथे परत आलो किंवा मी नाशिक येथे गेलो असतांना घोटी पोलीसांनी माझे मुलाला पो.स्टे. ला बोलावून घेतले आणि त्याच्या को-या कागदावर सहया घेतल्या किंवा दोन ते तीन दिवसांनंतर मी घोटी पो.स्टे. ला जावून एफआयआर ची प्रत मागितली तेव्हा त्यांनी

मला एफआयआर ची प्रत दिली किंवा मी पोलीसांना सांगितले की माझे सांगणेप्रमाणे तुम्ही फिर्याद लिहिली नाही तेव्हा पोलीसांनी मला हाकलून दिले किंवा मी पोलीसांना कागदपत्र मागण्यासाठी अर्ज दिला परंतु त्यांनी मला कागदपत्र दिली नाही असे माझे जबाबात लिहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की आरोपींनी केलेल्या मारहाणीमूळे मला ऐकायला कमी येते, माझया शरीरातील रक्त कमी झाले, मनक्याचा त्रास सुरु झाला असे जबाबात लिहिलेले नाही. पोलीसांनी माझे जबाबात उपरोक्त मजकूर लिहिलेला नाही याकरीता मी पोलीसांविरुध्द त्यांचे वरीष्ठांकडे तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे पोलीसांशी संबंध वाईट नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझे जबाबात जो मजकूर लिहिला नाही व जो मजकूर मी न्यायालयासमक्ष सांगितला आहे तो मजकूर मी आरोपींविरुध्द खोटा सांगत आहे.

हे म्हणणे खरे आहे की सदर प्रकरणातील ४ साक्षीदार माझी पत्नी, आई, मुलगा व मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की माझी राईस मिल आहे. हे म्हणणे खरे नाही की निखिल खाबिया व संपत घारे हा माझे राईल मिल मध्ये काम करतो. भुषण भंडारी हा माझा नातेवाईक नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपींविरुध्द खोटी केस करणेकरीता माझे घरातील लोकांचे नावे घेवून मी आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. मी ज्या वसाहतीमध्ये राहतो त्या वसाहतीला ११ बंगला म्हणुन ओळखले जाते. हे म्हणणे खरे नाही की ११ बंगल्यापर्यत सतत गाडींची वर्दळ सुरु असते. हे म्हणणे खरे आहे की आजुबाजुला इतर लोक व आरोपींची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की जर तेथे कोणतेही भांडणाची घटना घडली तर पाच पंचवीस लोक गोळा होतात. हे म्हणणे खरे नाही की माझया बंगल्याच्या आजुबाजुला मोठमोठी झाडे लावलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी वॉलकंपाउंड बाहेर स्कुटर पार्क करुन ठेवत असल्यामूळे येणा-या जाणा-या लोकांना त्रास होतो.

हे म्हणणे खरे आहे की घोटी ग्रमपंचायतीचे सदस्य किंवा सरपंच यांचेसोबत माझा कोणताही वाद नाही. हे म्हणणे खरे आहे की घोटी ग्रामपंचायतीने मला दि.

२०/०९/२०२३ रोजी माझे वॉलकंपाउंडमध्ये झाडांच्या फांदया वाढल्यामूळे विदयुततारांना अडथळ निर्माण होतो अशी नोटीस दिली होती.

**न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्यामूळे उलटतपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/-

( मोहिनी ननवरे )

दिनांक- ०४/०३/२०२६

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
इगतपुरी